नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १५१ Issue - 151 | वार रविवार दि. १९ ऑक्टोबर २०२५ Blow- Sunday Date 19 October 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# धनत्रयोदशीला सोने आणि चांदीची विक्रमी खरेदी

## सोने चांदीसह तब्बल १ लाख कोटींची खरेदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सोने आणि चांदीच्या दरात यंदा मोठी वाढ होऊन देखील भारतीयांचा दागिने खरेदीचा उत्साह मावळलेला नाही. सोने आणि चांदीची विक्रमी खरेदी करत भारतीय ग्राहकांनी धनत्रयोदशीच्या दिवशी अंदाजे एक लाख कोटी रुपये खर्च केले आहेत. व्यापारी संघटना कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स म्हणजे कॅटनं ही माहिती दिली आहे.

### होऊ दे खर्च, धनत्रयोदशीलाच भारतीयांनी तिजोरी उघडली

कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सच्या माहितीनुसार सोने आणि चांदीची एका दिवसातील ६० हजार कोटी रुपये आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा २५ टक्के वाढ झाली आहे. सोन्याचे दर गेल्या वर्षीच्या तुलनेत ६० टक्क्यांनी वाढून १३०००० रुपयांवर पोहोचले आहेत. तरी देखील भारतीय खरेदीदारांचा उत्साह कमी झालेला नाही.

कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सचा विभाग अखिल भारतीय दागिने आणि सुवर्णकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष पंकज अरोरा यांनी म्हटलं की, गेल्या दोन दिवसात दागिने बाजारात मोठी गर्दी पाहायला मिळाली. दिल्लीच्या सराफा बाजारात १०००० कोटी रुपयांची विक्री झाली आहे. धनत्रयोदशीचा दिवस सोने, चांदी, भांडी, समृद्धीचं प्रतीक असलेल्या वस्तूंच्या खरेदीसाठी शुभ दिवस मानला जातो. पाच दिवसांच्या दिवाळीचा हा पहिला दिवस मानला जातो.

चांदीचे दर गेल्या वर्षीच्या ९८००० रुपयांवरुन ५५ टक्क्यांनी वाढून १८०००० रुपयांवर पोहोचले आहेत. तरी देखील ग्राहकांची मागणी मोठ्या प्रमाणावर आहे. सोने चांदी शिवाय भांडी आणि घरगुती उपकरणांच्या विक्रीतून १५००० कोटी, इलेक्ट्रॉनिक्स आणि विजेच्या उपकरणांच्या विक्रीतून १० हजार कोटी आणि सजावटीच्या वस्तू आणि धार्मिक सामग्रीच्या विक्रीतून ३००० कोटी रुपयांची कमाई झाल्याची माहिती आहे.



कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सचे महासचिव आणि भाजप खासदार प्रवीण खंडेलवाल यांनी या वाढीचं श्रेय वस्तू आणि सेवा कराच्या दरातील कपातीला आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वदेशी वस्तूंच्या खरेदीला प्रोत्साहन देण्याच्या धोरणाला दिलं. भारतीय ग्राहक स्वदेशी उत्पादनाला प्राधान्य देत असल्यानं छोटे व्यापारी, कारागीर आणि उत्पादकांना फायदा होत असल्याचं म्हटलं.

# मुंबई सायबर विभागाची मोठी कारवाई; शेअर मार्केटमधून ट्रेडिंग फ्रॉडप्रकरणात बंगळुरूतून चौघांना अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ऑनलाईन जुगार, डिजिटल अरेस्ट, शेअर मार्केटिंग (डहरीश ारीझशीं) असे एक ना अनेक प्रलोभने दाखवून सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक होत आहे. गेल्या काही वर्षात सायबर गुन्ह्यात मोठी वाढ झाली असून आर्थिक फसवणूक केल्याचे बहुतांश गुन्हे आहेत. आता, पुन्हा एकदा ऑनलाईन शेअर मार्केटच्या माध्यमातून जादा नफा देण्याच्या आमिषाने लोकांची फसवणूक झाल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी ४ जणांना बंगरूळू सायबर पोलिसांनी अटक केली आहे. ऑनलाईन शेअर ट्रेडिंग फ्रॉड विरोधात मुंबई सायबर (लूलशी ोश्रिळलश) कक्षाची ही मोठी कारवाई मानली जात आहे. बंगळुरूच्या डिजिटल मार्केटिंग कंपनीच्या चार उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. डिजिटल मार्केटिंग कंपनी व्हॅल्यू लिफच्या अधिकाऱ्यांनी सायबर फ्रॉडमध्ये गुंतलेल्या हाँग काँगच्या कंपनीला मदत केल्याचा आरोप ठेवत त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आलीय. डिजिटल अरेस्ट प्रकरणानंतर आता ऑनलाईन शेअर ट्रेडिंग फ्रॉड विरोधात अशा पद्धतीची पहिलीच कारवाई असल्याचे समजते.

व्हॅल्यू लिफ कंपनीच्या उपाध्यक्ष (सेल्स) आणि अकाउंट्स हेड यांच्यासह एकूण चौघांना अटक करण्यात आली आहे. हाँग काँगच्या फर्स्ट ब्रीज कंपनीने फेसबुकवर जुलै महिन्यात देशात ऑनलाईन शेअर ट्रेडिंग फ्रॉडच कॅम्पेन्न चालवलं होत. या कॅम्पेन दरम्यान अर्थ तज्ज्ञांचे डीप फेक व्हिडिओ बनवून अनेकांना शेअर ट्रेडिंग फ्रॉडमध्ये पैसे गुंतवण्यात उद्युक्त करण्यात आलं होतं. यां कॅम्पेनसाठी व्हॅल्यू लिफ कंपनीच्या प्लॅटफॉर्मचा वापर झाल्याचा आरोप आहे. कॅम्पेन दरम्यान व्हॅल्यू लिफची अनेक खाती फेसबुकची पेरेंट कंपनी मेटाने येल्लो फ्लॅग देखील केली होती. मात्र, त्यानंतरही कॅम्पेन सुरूच ठेवल्याचा आरोप कंपनीवर आहे, त्यातूनच बंगरुळू सायबर विभागाने कारवाई करत कंपनीच्या ४ उच्च पदस्थ अधिकाऱ्यांना बेड्या ठोकल्या असून अधिक तपास सुरू आहे.

**दिवाळीनिमित्त ४ दिवस शेअर बाजार बंद**

देशभरात दिवाळीच्या सणाचा उत्साह पाहायला मिळत आहे, त्यामुळे दिवाळीनिमित्ताने भारतीय शेअर बाजार २१ ऑक्टोबरला मंगळवारी आणि लक्ष्मीपूजनानिमित्त बंद राहणार आहे. यानंतर २२ ऑक्टोबरला दिवाळी बालिप्रतिपदेच्या निमित्तानं शेअर बाजारात ट्रेडिंग होणार आहे. २५ ऑक्टोबरला शनिवार आणि २६ ऑक्टोबरला रविवार असल्यानं या दिवशी देखील शेअर बाजार बंद राहील. म्हणजेच येत्या आठवड्यात केवळ तीन दिवस शेअर बाजार सुरु राहील. दिवाळीला मल्टी कमोडिटी एक्सचेंज २१ आणि २२ ऑक्टोबरला बंद राहील.

# यात्रेहून परतताना मोठा अनर्थ, घाटात वाहन उलटून भाविकांचा अंत; एकाच गावातील पाच तरुणांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नंदुरबार : सातपुड्यातील प्रसिद्ध असलेल्या अस्तंबा यात्रेवरून परतताना चांदशैली घाटात पीकअप वाहनाचा भीषण अपघातात झाला. या अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला आहे. तर १५ जण गंभीर जखमी झाले आहेत. काही रुग्णांची प्रकृती गंभीर असल्यानं त्यांना नंदुरबार येथील जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. दरम्यान, या अपघातात नंदुरबार तालुक्यातील घोटाणे या गावातील पाच युवकांचा मृत्यू झाला आहे. तर गावातीलच पाच युवक जखमी आहे. धनत्रयोदशीच्या दिवशी गावातील पाच युवकांचा मृत्यूमुळे गावावर शोककळा पसरली आहे.



सातपुड्यातील धडगाव तालुक्यातील अस्तंबा येथे अश्वत्थामा ऋषींची दरवर्षी यात्रा भरते. गेल्या दोन दिवसापासून यात्रा सुरू झाली असून. महाराष्ट्र, गुजरात व मध्य प्रदेश या तीन राज्यातील हजारो भाविक या ठिकाणी हजेरी लावत असतात. दरम्यान, अश्वत्थामा ऋषींचं दर्शन घेऊन परतणाऱ्या पिकअप वाहनाचा तळोदा ते धडगाव दरम्यान असलेल्या चांदशैली घाटातील मकड टेकडीजवळ भीषण अपघात झाला. या दुर्दैवी घटनेत एकूण आठ जणांचा मृत्यू झाला आहे. नंदुरबार तालुक्यातील घोटाणे येथील पवन गुलाब मिस्तरी (वय २४), बापू छगन धनगर (वय २४), चेतन पावबा पाटील (वय २३), भूषण राजेंद्र गोसावी (वय ३०), राहुल गुलाब मिस्तरी (वय २२) आणि नंदुरबार तालुक्यातील कोरीट येथील हिरालाल जगन फडके, योगेश लक्ष्मण ठाकरे आणि नंदुरबार शहरातील गणेश संजय भील (वय १५) अशा एकूण आठ जणांचा मृत्यू झाला आहे.

तर क्रिष्णा अशोक मिस्तरी (रा. घोटाणे), रविराज ठाकरे (रा. बालदा), कृष्णा पाडवी (रा.बालदा), परविन संजय वाघ, अर्जुन चुनीलाल सोनवणे (रा.तळोदा), राहुन राजसिंग ठाकरे (रा. समशेरपुर नंदुरबार), दिपक हिम्मत गोसावी (रा. घोटाणे, नंदुरबार), सागर चुडामन पाटील (रा.घोटाणे), सागर राजु ठाकरे (रा. समशेरपुर), नमन मुकेश गायकवाड (रा.तळोदा), जयेश महेंद्र मिस्तरी (रा.घोटाणे), गणेश सुभाष गोसावी (रा. घोटाणे), दिनेश सतीलाल ठाकरे (रा. कोळदा), बापु खंडु पाटील (वय १५, रा. घोटाणे) आणि कार्तिक योगेश थोरात हे भाविक जखमी झाले आहेत. जखमींना नंदुरबार येथील जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आलं आहे.

या वाहनात सुमारे ४० भाविक असल्याचं सांगण्यात येत आहे. मृतांमध्ये बहुतांशी नंदुरबार तालुक्यातील भाविक आहेत. अस्तंबा यात्रेसाठी गेल्या दोन दिवसापासून हजारो भाविक जाताना पायी तर परत त्यांना मिळेल त्या वाहनाने गावाकडे धनत्रयोदशीला परतत असतात. धनत्रयोदशीच्या दिवशीच भीषण अपघातात आठ जणांचा मृत्यू झाल्यानं जिल्हाभर हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

### विशेष तपासणी अभियानांतर्गत

# राज्यात ३ हजार ४८५ अन्न आस्थापनांची तपासणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत राज्यात 'सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा' हे विशेष तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत १२ ऑक्टोबर २०२५ पर्यंत राज्यात ३ हजार ४८५ अन्न आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीमध्ये दूध, खवा/मावा, खाद्यतेल, तूप, मिठाई, ड्रायफ्रूट्स, चॉकलेट्स, भगर व अन्य अन्नपदार्थांचे एकूण ४ हजार ६७६ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. या तपासणीत अनियमितता आढळलेल्या एक हजार ४३१ आस्थापनांना सुधारणा नोटीस देण्यात आली असून ४८ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले तर एका आस्थापनेचा परवाना रद्द करण्यात आला असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाने दिली आहे.

### अन्न व औषध प्रशासन विभागाची माहिती

जनतेस सुरक्षित, दर्जेदार अन्न उपलब्ध करून देण्यासाठी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, राज्यमंत्री योगेश कदम, सचिव धीरज कुमार व आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न व औषध प्रशासना विभागांमार्फत राज्यात सणासुदीच्या कालावधीत अन्नपदार्थांमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी 'सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा' हे विशेष तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. हे अभियान दिनांक ११ ऑगस्ट २०२५ ते २५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येत आहे.

नागरिकांनीही सणासुदीच्या काळात अन्नपदार्थ खरेदी करताना गुणवत्ता, पॅकिंगवरील माहिती आणि परवाना क्रमांक यांची खात्री करूनच खरेदी करावी. भेसळीबाबत संशय आल्यास जवळच्या अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागाने केले आहे.

# तीन युवा खेळाडूंचा मृत्यू, आयसीसीचा अफगाणिस्तानला पाठिंबा, पाकिस्तानवर लागणार बंदी?

नवी दिल्ली : अफगाणिस्तानमध्ये १७ ऑक्टोबरला पाकिस्तानकडून रात्री उशिरा एअर स्ट्राईक करण्यात आला. या एअर स्ट्राईकमध्ये तीन क्रिकेटपटूंसह नागरिकांचा मृत्यू झाला. या घटनेसंदर्भात अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डानं आयसीसीकडे एक अपील केलं आहे. यानंतर आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनी एक्स प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. जय शाह यांनी अफगाणिस्तानच्या तीन युवा खेळाडूंचा मृत्यू झाल्याबद्दल शोक व्यक्त केला आहे.

आयसीसी अध्यक्ष जय शाह यांनी सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एक पोस्ट केली आहे. त्यात जय शाह यांनी अफगाणिस्तानचे तीन युवा क्रिकेटपटू कबीर आगा, सिबगतुल्लाह आणि हारुन याच्या मृत्यूबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. या तिघांची स्वप्न या नापाक हल्ल्यामुळं अपूर्ण राहिली, या तीन होतकरु क्रिकेटपटूंच्या निधनानं केवळ अफगाणिस्तान क्रिकेट नाही तर संपूर्ण क्रिकेट विश्वाचं नुकसान झालं आहे. आम्ही अफगाणिस्तान क्रिकेट बोर्ड आणि ज्यांनी त्यांच्या प्रियजनांसह आहोत ज्यांच्या कुटुंबातील लोक त्यांनी गमावले आहेत.

जय शाह यांच्या वक्तव्यानंतर अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डानं एक पोस्ट केली आहे. जय शाह यांच्या भूमिकेचं त्यांनी सन्मान करत असल्याचं म्हटलं. अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाच्या अपिलावर या हल्ल्या विरोधात आयसीसीकडून भूमिका मांडली गेल्यानं आभार मानत असल्याचं त्यांनी म्हटलं. बोर्डानं पुढं म्हटलं की त्यांनी नेहमी क्रिकेटला राजकारणापासून वेगळं ठेवलं आहे. सर्व निर्णय आयसीसीच्या नियमानुसार घेतले आहेत.

### चंद्रभागेच्या तिरी भक्तांची मांदियाळी

### धनत्रयोदशी निमित्त श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला अलंकार परिधान

# लक्षदीप हे उजळू दे चंद्रभागेच्या तिरी; धनत्रयोदशीच्या निमित्ताने दिव्यांनी सजली पंढरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिवाळीच्या सणाला सुरुवात झाली असून काल वसुबारस नंतर आज धनत्रयोदशीचा उत्साह सर्वत्र पाहायला मिळत आहे.

एकीकडे घरोघरी दिव्यांची उजळण पाहायला मिळत आहे, दुसरीकडे उंचच उंच इमारतीवर विद्युत रोषणाई आकर्षक ठरत आहेत.

देशभरातील देवस्थान, मंदिर, नदीकिनारी देखील दिव्यांची उजळणी पाहायला मिळत असून तो क्षण कॅमेऱ्यात कैद करण्यासाठी अनेकजण गर्दी करत आहेत

पंढरी नगरी देखील दिवाळीच्या दिवे प्रकाशात उजळून निघाली आहे. लक्ष लक्ष दिव्यांनी चंद्रभागा सुद्धा उजळून निघाली आहे.

चंद्रभागेच्या घाटांवर दीप उत्सवाच्या स्वरूपात सोनेरी रूप पाहायला मिळत आहे, चंद्रभागेच्या तिरी भक्तांची मांदियाळी पाहायला मिळत आहे. धनत्रयोदशीनिमित्त चंद्रभागेच्या तिरावर आज लक्ष लक्ष दिव्यांनी मंदिर परिसर उजळून निघाला आहे.

धनत्रयोदशी निमित्त श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पुरातन व मौल्यवान अलंकार परिधान करण्यात आले आहेत.

श्री विठ्ठलास आज सोने मुकुट, नाम निळाचा, कौस्तुभ मणी, दंड पेट्या जोड मोठा, हिऱ्याचा कंगण जोड, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी २ पदरी, शिरपेच मोठा १० लोलक असलेला, शिरपेच लहान, मस्त्य जोड, तोडे जोड, एकदाणी तुळशीची माळ ३ पदरी इत्यादि अलंकार परिधान करणत्यात आलेले आहेत.

रुक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा, इत्यादि पारंपारिक अलंकार परिधान करणत्यात आलेले आहेत.



# महात्मा फुल्यांनी हंटर आयोगाला १४३ वर्षापूर्वी दिलेल्या ऐतिहासिक निवेदनाच्या वर्धापनदिनानिमित्त.

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मित्रहो,

भारत पारतंत्र्यात असताना ब्रिटिश काळात जनतेसाठी शिक्षणाची फारच दुरा-वस्था झालेली होती. अशावेळी १८१३ मध्ये शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असावे ही शिक्षण तज्ज्ञ लॉर्ड मेकाले यांची सूचना लॉर्ड बेंटिग यांनी स्वीकारली होती. १८५४ मध्ये वूड यांनी सरकारने शिक्षण क्षेत्रातून अंग काढून घेताना केवळ प्राथमिक शिक्षणासाठी अनुदान द्यावे, अशी शिफारस केली होती. १८५५ मध्ये देशातील २० कोटी लोकांसाठी सरकार चालवीत असलेल्या सरकारी अनुदान प्राप्त १४७४ शिक्षण संस्था होत्या, ज्यात ६७५६९ विद्यार्थी शिकत होते. तर ख्रिस्ती धर्मो पदेशकांनी चालविलेल्या १६२८ शाळांमध्ये ६४००० विद्यार्थी शिकत होते.

१८८१-१८८२ या शैक्षणिक वर्षात ब्रिटिश सरकारने शिक्षणासाठी ७० लाख रुपयांची तरतूद केली होती. त्यापैकी १६ लाख ७७ हजार रुपये प्राथमिक शिक्षणासाठी वापरण्यात आले होते. ब्रिटिश काळात लॉर्ड रिपन या उदारमतवादी व्हाईसरॉयच्या कारकिर्दीत त्यांनी सर विल्यम्स विल्सन हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एक शिक्षण आयोग नेमला होता. ज्यात वीस सदस्य होते त्यापैकी आठ सदस्य भारतीय होते. या आयोगाने वूडच्या खलीत्याचा पुनरुचार केला होता. तसेच आदिवासी सह इतर मागासवर्गीयांच्या शिक्षणाकडे लक्ष देण्याचे मान्य केले होते. या शिक्षण आयोगाला महात्मा फुलेंनी निवेदन देताना हे स्पष्ट केले होते की, किमान बारा वर्षे वयापर्यंतच्या मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे. तसेच प्राथमिक शाळांच्या संख्येत वाढ करण्यासाठी देशी शाळांतून प्रमाणपत्रीत, प्रशिक्षित शिक्षक नेमले जावेत ज्यात ही प्रक्रिया अवलंबिली जाईल, त्यांना अनुदान दिले जावेत. स्थानिक कराच्या निधी पैकी अर्धा अधिक निधी हा केवळ प्राथमिक शिक्षणावर खर्च करावा. आपापल्या क्षेत्रातील सर्व प्राथमिक शाळा स्वखर्चाने चालविण्यासाठी नगरपालिकांना भाग पाडण्यासाठी सरकारने रीतसर कायदा पास करावा. मात्र प्राथमिक शाळांचा कारभार शिक्षण खात्याच्या देखरेखी-खालीच चालला पाहिजे. तसेच प्रांतिक व मध्यवर्ती निधीतून पुरेशी अनुदान मिळण्याची तरतूद करण्यात यावी. अशा अनेक महत्त्व-पूर्ण बाबी नमूद केलेल्या आहेत. मात्र या आयोगाने प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे. अशी शिफारस केलेली नाही. अशाप्रकारे या हंटर आयोगाने सर्वच सूचना स्वीकारल्या नसल्या तरी विल्यमस हंटर यांनी तयार केलेल्या मसुद्यात सुधारणा करणाऱ्या समितीने केलेल्या बदलावर खाजगीत प्रतिक्रिया व्यक्त करताना हंटर यांनी स्वतः असे म्हटले




होते की, आपण लिहिलेल्या भागाची मांडणी अशा रीतीने करण्यात आली आहे की, त्यात आपले असे काही राहिले नाही. असे फ्रान्सिस हेन्स स्काईन यांनी लिहिलेल्या लाईफ ऑफ सर विल्यम्स विल्सन हंटर या पुस्तकात नमूद करण्यात आलेले आहे.

हंटर आयोगातील अहवालावर राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांच्या निधनानंतर प्रकाशित झालेल्या सार्वजनिक सत्यधर्म या पुस्तकात हिंदूतील आर्य ब्राह्मणाखेरीज; शूद्रादि-अतिशूद्र, भिल्ल-कोळी वगैरे लोकांविषयी मुळीच ज्ञान नसल्याने ते तसा वाचाळपणा करीत आहेत. अशा प्रकारची महात्मा फुलेंनी हंटर यांच्यावर प्रखर शब्दात टीका केली असल्याची नोंद पाहायला मिळते. या अनुषंगाने वर्तमानातील भारतीय समाज जीवनात नवीन शैक्षणिक धोरणाचा विचार केल्यास तीच टीका वर्तमानात शैक्षणिक सुधारणा करूइच्छिणाऱ्यांना चपखल बसते की काय? याची चिकित्सा केली पाहिजे.

१८५१ ला महात्मा फुलेंनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली होती तदनंतर मांग-महाराच्या अस्पृश्य मुला मुलींसाठी दोन शाळा सुरू केल्या होत्या. त्याची पाहणी करण्यासाठी आलेल्या शिक्षण मंडळाचे सर एर्स्किन पेरी आणि सरकारचे सचिव लुम्सडेन यांनी फुल्यांचा शाल जोडी देऊन सत्कार केला होता. दारिद्र्यात खितपत पडलेल्या व हल-ाखीचे जीवन जगणा-या असहाय जनतेच्या शिक्षणावर खर्च करण्याऐवजी ब्राह्मणांच्या उच्च शिक्षणावर जास्त प्रमाणात खर्च करीत असल्याचे फुले यांनी तेव्हाच निदर्शनास आणून दिले होते. जे संयुक्तिक नव्हते कारण सरकारच्या महसुलातील फार मोठा हिस्सा घाम गाळणाऱ्या श्रमिक रयतेच्या कष्टातून उभा राहत होता. ज्या अनुषंगाने एका इंग्रजी लेखकाचे मत विचारात घेतले पाहिजे. ते असे म्हणतात की, आमचे उत्पन्न हे शिलकी नफ्यातून येत नाही तर ते येते मूळ भांडवलातून अर्थात ते चैनीच्या वस्तूवरील करातून उभे राहत नाही ; ते उभे राहते अत्यंत निकृष्ट अशा गरिबांच्या गरजेच्या वस्तूवरील करातून, हे उत्पन्न अश्रूचे आणि पापाचे फळ आहे. हे विचार आपण ऐतिहासिक दृष्टीने अधोरेखित केले पाहिजे. शूद्रादिशूद्र हाच या देशाचा खरा पोशिंदा आणि आधारस्तंभ असल्यामुळे सरकारने आपल्या आर्थिक व राजकीय अडचणीवर मात करण्याच्या दृष्टीने ब्राह्मणावर नव्हे! तर शूद्रादि-शूद्रावरच विसंबून राहिले पाहिजे.

तत्कालीन प्राथमिक शिक्षण व्यवस्थेत बहुतांश शाळेत ब्राह्मण शिक्षक असायचे त्यातही प्रशिक्षित फार कमीच असायचे. करिता शेतकरी वर्गातील शिक्षक नेमून त्यांना प्रशिक्षित केले पाहिजे जेणेकरून सहजपणे विद्यार्थ्यांत मिसळता येईल. ज्याचा सकारात्मक परिणाम होऊ शकेल. त्यांना संयुक्तिक वेतन दिले पाहिजे. तसेच शैक्षणिक फी च्या अनुषंगाने विचार करता कर भरणारे व कर न भरणारे यांच्या पाल्यांना प्राथमिक शाळेची फी ही एकास दोन या प्रमाणात असायला हवी. उच्च शिक्षणातील अभ्यासक्रमात तांत्रिक आणि व्यवहारोपयोगी शिक्षणा-चा अंतर्भाव असायला हवा. अशा अनेक बाबीची मांडणी करताना शेवटी राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांनी शिक्षण आयोगाला अशी विनंती केली होती की, स्त्रियांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा प्रसार आणखी मोठ्या प्रमाणात होईल, अशा प्रकारच्या उपाययोजनाना संमती दिली पाहिजे. असे परखड मत त्यांनी व्यक्त केले होते. सदरील निवेदनाच्या १४३ व्या वर्धापन दिनानिमित्त आपण सर्वांनी या सर्व बाबी नीट समजून घेतल्या पाहिजेत. करिता हा थ्रोटक शब्दप्रपंच आपल्यासाठी प्रस्तुत केलेला आहे.

**लेखक : मेश्राम बी. बी., संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन, दि नॅशनल कौन्सिल मेंबर ऑफ दि नाग असोसिएशन. (आईना)**
**संपर्क : ९४२१६७८६२८, ८९८३०८२१२८ (थह)**
**circumference1968@gmail.com**

# शाळा महाविद्यालयातून शिक्षकांनी भित्तिपत्रकाचे प्रकाशन करावे : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : विद्यार्थ्यांची लेखन कला, बौद्धिक ज्ञान संपदा तसेच अंगभूत कौशल्याचा विकास व्ह-ावा म्हणून शिक्षकांनी शाळा महाविद्यालयात भितीपत्रकाचे प्रकाशन करावे असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.



महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील इतिहास व राज्यशास्त्र अभ्यास मंडळाने खास दीपावली सणानिमित्त आयोजित केलेल्या भितीपत्रक प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, ज्युनियर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा

**कल्याणशेट्टी महाविद्यालयात दिवाळीनिमित्त भित्तिपत्रक प्रकाशन कार्यक्रम**

भरमशेट्टी, भित्तिपत्रकाचे संपादक प्रा डॉ शितल झिंगाडे-भस्मे, प्रा सौरभ भस्मे उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील अंगभूत कला कौशल्याचा विकास केला पाहिजे, प्रतिभावंत विद्यार्थ्यांना लेखन करण्याची संधी दिली पाहिजे, त्यामुळे भविष्यकाळात विद्यार्थी साहित्याची निर्मिती करतील, विचारवंत होतील, नोबेल पारितोषिक देखील मिळवतील.

मल्लिनाथ मसुती म्हणाले की, विद्यार्थ्यांनी नेहमी आपल्यातील कला कौशल्य दाखविले पाहिजे. त्यांच्यासाठी शिक्षकांनी व्यासपीठ निर्माण केले पाहिजे, त्यामुळे संस्था व शाळा महाविद्यालयांना देखील नावलौकिक प्राप्त होण्याची संधी मिळते.

प्रारंभी डॉ शितल झिंगाडे-भस्मे यांनी भित्तीपत्रकाची संकल्पना विशद केली, त्यानंतर मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या हस्ते भित्तिपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. शेवटी प्रा सौरभ भस्मे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने कळंब तहसीलदारांना निवेदन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनीधी/सुधाकर रणदिवे : लोक जनशक्ती पार्टी रामविलास पासवान पार्टीच्या वतीने तहसील कार्यालय कळंब यांना विविध मागण्यासाठी निवेदन देण्यात आले.

त्या मागण्या पुढीलप्रमाणे *पद्मश्री दादासाहेब सबलीकरण योजनेचा लाभ अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांना मिळणे बाबत.

* ज्या गावात गायरान जमिनीचा ताबा गेली १५ ते २० वर्षापासून अनुसूचित जाती व नव बौद्ध घटकाकडे आहे त्या जमिनी दारिद्र्य रेषेखालील असून भूमिहीन अनुसूचित जाती नवबौद्ध आहेत त्यांना त्या जमिनी वाटप करून नावावर करण्यात यावे.

* महसूल दप्तरी सातबारा वर नोंदी घेण्यात याव्या. तसेच कळंब येथील उपजिल्हा रुग्णालय हे दुसऱ्या जागेवर स्थलांतरित करू नये, आहे त्या जागेत विस्तारीकरण करण्यात यावे.

* शेतकरी पिक कर्ज माफी बाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात यावा.

* धाराशिव जिल्ह्यात अतिवृष्टी मुळे नुकसान झालेल्या शेतकरी यांना अनुदान रक्कम तत्काळ वाटप करण्यात यावी.

* संजय गांधी राष्ट्रीय वर्धपकाळ योजना चे मानधन दिवाळीपूर्वी देण्यात यावे.

* शिधापत्रिकाधारकांना साखर तेल रवा या जीवनावश्यक वस्तूचे वाटप करण्यात यावे. या सर्व मागण्यावर लवकरात लवकर योग्य तो निर्णय घ्यावा. मागण्या पूर्ण न झाल्यास लोक जनशक्ती पार्टी राम विलास पासवान पार्टीच्या वतीने दिनांक २६ ऑक्टोबर रोजी आंदोलन करण्यात येईल. निवेदन देताना लोजपा जि. अध्यक्ष राजाभाऊ गायकवाड. युवा जिल्हाध्यक्ष मुकेश गायकवाड, तालुका अध्यक्ष, भारत कदम, शहराध्यक्ष, नागेश धीरे, राहुल बनसोडे, बाबा टोपे, भिवाजी ताकपिरे, बळीराम दहिरे, बालाजी वाघमारे,दत्ता चंदनशिवे व ईतर कार्यकर्ते उपस्थित होते.

## भिवंडी चौधरपाडा येथे बळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : दरवर्षी प्रमाणे यावर्षीही ओबीसी संघर्ष समिती ठाणे यांच्या मार्फत राजमाता जिजाऊ कलामंच प्रस्तूत मनोरंजनातून प्रबोधन घडविणारा सांस्कृतिक कार्यक्रम बळी पहाट यावर्षी २२ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळीं ठीक ६.३० वाजता शिवमंदिर, चौधरपाडा, ता. भिवंडी येथे सादर होत आहे. सम्राट बळीराजाचा खरा इतिहास, शेतकरी, कामकरी वर्ग यांची खरी संस्कृती, या संस्कृतीशी निगडित असलेले गाणे, धमाल नृत्य यांची सांगड घालून तयार केलेला, ओबीसी विषयांवर जनजागृती करणारा, प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलेला हा कार्यक्रम राजमाता जिजाऊ कलामंच सलग पाचव्या वर्षी नव्या पद्धती-ने सादर करत आहेत, तरी या कार्यक्रमासाठी सर्वांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आव-ाहन ओबीसी संघर्ष समिती मार्फत यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत सरपंचपदी परिचारक पार्टीचे औदुंबर ढोणे बिनविरोध तर उपसरपंचपदी अवताडे गटाचे समाधान देठे विजयी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत सरपंच पदी (भाजपा) परिचारक पार्टीचे औदुंबर ढोणे बेनिरोध तर उपसरपंच पदी (भाजपा) अवताडे गटाची समाधान देठे विजय.

लक्ष्मी टाकळी येथील सरपंच, उपसरपंच, निवडणूक तारीख १७/१० /२०२५ रोजी निवडणूक निर्णय अधिकारी रिंगण चव्हाण यांच्याकडून प्रक्रिया यशस्वीपणे राबवण्यात आली. ग्राम महसूल अधिकारी तलाठी किरण बडीवले ग्रामसेवक जयंत खंडागळे यांच्याकडून प्रक्रियेला ११ वाजता सुरुवात करण्यात आली.

ग्रामपंचायत मध्ये एकूण १७ सदस्य निवडणूक वेळी उपस्थित होते परिचारक गटाचे औदुंबर

**सोलापूर जिल्ह्यात शिवसेना शिंदे गटाला धक्का**

ध्वनी बिनविरोध हा विजय झाले तर उपसरपंच पदाची निवडणूक पार पडली त्यात गुप्त मतदान घेण्यात आले शिंदे गटाचे संजय साठे अवताडे गटाचे समाधान देते यांचा अर्ज राहिला गुप्त मतदान झाल्यानंतर एकूण १७ पैकी समाधान ताटी यांना ११ तर साठे यांना सहमती मिळाल्या असून गेले तीन वर्षापासून भाजप संध्याकाळी ग्रामपंचायत मध्ये युती होती तर या सरपंच निवडणूक भाजपा परिचारा गटाचे अभिनंदन तत्कालीन सरपंच संजय साठे यांचा या निवडणुकीत सहा मते पडून पराभव झाला. हा शिंदे गटाला सोलापूर जिल्ह्यातील पहिला मोठा धक्का बसला आहे आणि उपस्थितीत माजी पंचायत समिती सदस्य रामदास ढोणे पुष्पक बाजार समिती माजी संचालक परमेश्वर देठे, चंद्रभागा सहकारी साखर कारखाना ही संचालक महादेव देटे, महादेव काशी , विष्णू ताड, शंकर धोत्रे सुरेश तुकडे नानासो मोरे विठ्ठल ढोणे शंभू देव कदम बाबासाहेब पवार सोमनाथ ढवणे अनिल सोनवणे औदुंबर पोतदार माऊली देशमुख, शिव-ाजी मोरे सोमनाथ थेटे बापूस-ाहेब कदम, सोमनाथ भाकरे बापू उघडे, बाबासाहेब ढोणे नानेश्वर देते अशोक आपले मारुती जाधव दत्ता घोडके महेश धोत्रे मच्छिंद्र चंदनशिवे मारुती लोखंडे, सचिन वाळके सागर सारंडे बंडू थोपटे बापू देवकते भाऊसाहेब ढोणे गणेश ढोणे विजय देशपांडे धनु पाटील दादा सोनवणे मिलिंद देव




हुसेन तांबोळी सुरजी कोंडे धनंजय कारंडे सागर चंदनशिवे रवी वाघमारे दादा ढोणे समाधान ढोणे बाबत कविता राजमाने ज्योती पांढरे सूर्य ग्रामपंचायत सदस्य सर्व उपस्थित होते.

# महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेकडून पूरग्रस्त शेतकऱ्यांना ११ लाख रुपयांची मदत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : सोलापूर जिल्ह्यात यंदा अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यांना मदत करणे हे आपले सामाजिक कर्तव्य आहे या भावनेतून महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेकडून ११ लाख रुपयाचा चेक सीएम फंडासाठी आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते देण्यात आला.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोलापूर मुंबई विमान सेवेचा शुभारंभ करण्यासाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमास सोलापूर येथे आले होते. त्यावेळी संस्थेचे अध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यानी ११ लाख रुपयाचा चेक मुख्यमंत्र्यांना सुपूर्द केला. यावेळी संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, संचालक नितीन बिज्जरगी, विलास कोरे, विक्रम शिंदे, मिलन कल्याणशेट्टी आदी उपस्थित होते.

**मुख्यमंत्र्यांनी केले संस्थेचे कौतुक**

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय अक्कलकोट, सेमी इंग्लिश विभाग, अनंत चैतन्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय हन्नूर, मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालय अक्कलकोट येथील शिक्षक व शिक्षकेतर सेवक तसेच स्वामी विवेकानंद नागरी सह.पतसंस्थेचे व मल्टीस्टेट को-ऑप सोसायटीचे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपले एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी सामाजिक कृतज्ञतेच्या भावनेतून दिल्याबद्दल मान्यवरांनी विशेष कौतुक केले.

या उपक्रमाबद्दल संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, जूनियर कॉलेज विभाग प्रमुख पुनम कोकळगी, सेमी इंग्लिश विभाग प्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी अभिनंदन केले आहे.

**मुख्यमंत्र्यांकडून विशेष कौतुक**

**महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेतील सर्व शिक्षकांनी कृतज्ञता भावनेने अतिवृष्टी भागातील पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदत म्हणून दिलेली रक्कम लाख मोलाची आहे, त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष कौतुक केले.**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांसाठी पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात ८४ कोटीची मदत आजपासून खात्यावर जमा होणार : आ. आवताडे

## आमदार समाधान आवताडे यांची माहिती; शेतकऱ्यांना दिलासा, अद्याप अनेक ठिकाणांचे पंचनामे सुरुच

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवेढा / प्रतिनिधी

पंढरपूर आणि मंगळवेढा तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतातील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे . यामध्ये मका, सूर्यफूल, बाजरी, टोमॅटो, मिरची, कांदा, भुईमुग, उडीद, दोडका डाळिंब पेरू या पिकांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला होता त्या शेतकऱ्यांना सरकारने मदतीचा हात दिला असून पंढरपूर मंगळवेढा



मतदारसंघात ८८ हजार ५०५ शेतकऱ्यांच्या खात्यावर ८४ कोटी ४५ लाख रुपये नुकसान भरपाई जमा होण्यास सुरुवात झाली असून दिवाळीपूर्वी सर्व नुकसानभरपाई खात्यावर जमा होणार असल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली.

यंदाच्या खरिपामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले होते या संकटाशी सामना करण्याचे बळ देण्यासाठी आमदार समाधान आवताडे यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांना धीर देऊन परिस्थिती जाणून घेत मदतीपासून कुणीही वंचित राहणार नाही अशी ग्वाही त्यांनी शेतकऱ्यांना देत आपल्या कार्यालयातील स्वीयसहाय्यकांचे संपर्क क्रमांक शेतकऱ्यांसाठी खुले करत पंचनामासाठी अधिकाऱ्यांनी अडचण आणली तर संपर्क साधण्याचे आवाहन केले होते मंगळवेढा तालुक्यातील बोराळे व मारापुर मंडल मध्ये पर्जन्यमापक यंत्रात बिघाड झाल्यामुळे तेथील पाऊस कमी दाखवल्याने या मंडलचा नुकसान भरपाई मध्ये समावेश होण्याच्या अशा धूसर झाल्या होत्या मात्र संबंधित अधिकाऱ्यांना संपर्क करून पर्जन्यमापकाच्या बिघाडामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून देत आकडेवारी मध्ये सुधारणा करून मारापूर व बोराळे मंडलचाही या नुकसानीमध्ये आमदार समाधान आवताडे यांनी समावेश करत तेथील शेतकऱ्यांनाही दिलासा दिला आहे या अतिवृष्टीमुळे शेतातील उभ्या पिकांचे, घरांच्या झालेल्या नुकसानीमुळे सर्व ठिकाणचे जनजीवन विस्कळित झाले होते अशा सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे गेल्या पंधरा ते वीस दिवसापासून अधिकारी पंचनामे करत होते अद्याप काही ठिकाणचे पंचनामे सुरूच आहेत अनेक विहिरीची पडझड झाली आहे त्यांनाही मदत मिळणार असून त्याची प्रक्रिया पंचायत समितीकडे देण्यात आलेली आहे पंढरपूर तालुक्यात २८ हजार ७७५ बाधित शेतकरी असून त्यांना २६ कोटी ४५ लाख रुपये मदत जाहीर झाली असून मंगळवेढा तालुक्यातील ५९ हजार ७३० शेतकऱ्यांना ५८ कोटी रुपये मंजूर झाले असून आजपासून हे पैसे त्यांच्या खात्यावर जमा होतील. सतत पाठपुरावा करून शेतकऱ्यांची दिवाळी गोड करण्यासाठी रात्रंदिवस अधिकाऱ्यांना कामाला लावले त्यामुळेच शेतकऱ्यांची दिवाळी गोड होण्यास मदत होईल याचे समाधान वाटते असे आमदार समाधान आवताडे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.





## दीपावली २०२५: धनत्रयोदशी निमित्त श्री विठ्ठलास व रूक्मिणी मातेस अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : वसुबारस पासून दीपावली महोत्सवास सुरवात झाली आहे. पोशाखावेळी दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे धनत्रयोदशी निमित्त श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आले असल्याचे माहिती मंदिर समितीचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.

श्री विठ्ठलास सोने मुकुट, नाम निळाचा, कौस्तुभ मणी, दंड पेट्या जोड मोठा, हिऱ्याचा कंगण जोड, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी २ पदरी, शिरपेच मोठा १० लोलक असलेला, शिरपेच लहान, मस्त्य जोड, तोडे जोड, एकदाणी तुळशीची माळ ३ पदरी इत्यादि अलंकार परिधान करणत्यात आलेले आहेत.

तसेच रुक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा, इत्यादि पारंपारिक अलंकार परिधान करणत्यात आलेले आहेत.

तसेच दिपावलीत वसुबारस, धनत्रयोदशी दिवाळी पाडवा, नरकचतुर्दशी आणि लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिर, तुकाराम भवन, श्री.ज्ञानेश्वर दर्शन मंडप व भक्त निवास इत्यादि ठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आलेली आहे.

प्रतिवर्षी प्रमाणे श्री. विठ्ठल व रुक्मिणी मातेस पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. सदरचे अलंकार पाहण्यासाठी व दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

## अँड. अमोल पाटील नांदगाव जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार ) पक्षाकडून निवडणूक लढविण्यास इच्छुक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : वागदरी ता.तुळजापूर येथील सामाजिक कार्यकर्ते,भाषेवर प्रभुत्व असलेले नामवंत वक्ते म्हणून उदयास आलेले आमदार रोहित दादा पवार यांचे कट्टर समर्थक अँड.अमोल पाटील हे तुळजापूर तालुक्यातील नांदगाव जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार ) पक्षातर्फे निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत.

अँड.अमोल पाटील हे एम.एस्सी. बी.एड.सह कायद्याचे परवीधर असून त्याना सामाजिक व राजकीय कार्याची आवड आहे. राष्ट्रवादी काँग्रेस वक्ता सेल च्या माध्यमातून त्यानी धाराशिव जिल्ह्यातच नव्हे तर राज्यभर नामदार शरद पवार यांच्या नेतत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रसार आणि प्रचार करीत आहेत एक निष्ठेने पक्षाच्या वतीने त्यांनी जिल्हात अनेक उपक्रम राबवितात. वागदरी येथे शिव बसव राणा व काशीबा महाराज जन्मोत्सव समितीच्या वतीने शिवजयंतीच्या



निमित्ताने सर्व ग्रामस्थांना सोबत घेऊन शिव सप्ताहाचे आयोजन करून रक्तदान शिबिर महिला सक्षमीकरणाचे कार्यक्रम, युवकासाठी कार्यक्रम, विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन शिव सप्ताहाच्या माध्यमातून करण्यास त्यांनी गेल्या दहा वर्षापासून सुरुवात केली आहे. त्यांना सामाजिक आणि राजकीय कार्याची मोठी आवड आहे त्यांनी आपला शेती हा मुख्य व्यवसाय सांभाळून समाजकार्यासाठी स्वतःला झोकून दिले आहे.

त्यानी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये स्वतःची ओळख निर्माण केली आहे.

सामाजिक क्षेत्रामध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्याना अनेक पुरस्कार मिळाले आहेत.वेगवेगळ्या सामाजिक चळवळीतील संघटनामधील पदावर ते कार्यरत आहेत.त्यांचा पक्षातील राज्य पातळीवरील नेत्यांबरोबर थेट संपर्क आहे.आमदार रोहित दादा पवारांनी काढलेल्या युवा संघर्ष यात्रेमध्ये पुणे ते नागपूर ८०० किलोमीटरचा पायी प्रवास करून पक्षाची भूमिका जनमाणसात रुजविण्याचे काम त्यानी केले आहे. पवार कुटूंबात एक विश्वासाचे नाते त्यांनी निर्माण केले आहे.

नंदगाव जि.प. गट हा सर्वसाधारण (खुला) प्रवर्गासाठी राखीव असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने जर पक्षाच्या नेत्यांनी त्याना संधी दिली तर नंदगाव जिल्हा परिषद गटाचा चेहरा मोहरा बदलनार असा निर्धार त्यानी केला आहे.

तळागाळातील जनतेला विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी अग्रेसर राहणार असल्याचा संकल्प त्यानी केला आहे.शिव शाहू फुले आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांचे ते पाईक आहेत.

शिवसेना, काँग्रेस, पक्षाच्या जिल्हा तालुका पातळीवरील नेत्या सोबत त्यांचे चांगले संबंध आहेत.ग्रामीण भागातील प्रत्येक गावामध्ये त्यांचा चांगला जनसंपर्क आहे.महाविकास आघाडीचा सर्व समावेशक नवा चेहरा त्यांच्या उमेदवारीमुळे जनतेला मिळणार आहे.

महाविकास आघाडीने अमोल पाटील सारख्या युवा तरुण तडफदार अभ्यासू व्यक्तीला जिल्हा परिषद मध्ये जाण्याची संधी दिली तर नक्कीच याचा फायदा ग्रामीण भागातील जनतेला होईल.

अमोल पाटलांच्या उमेदवारीमुळे नांदगाव जिल्हा परिषद गटामध्ये मोठी चुरस निर्माण होणार.असी राजकीय वर्तळात चर्चा आहे.

## राष्ट्रवादीचे नेते नागेश फाटे यांच्या हस्ते काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष मोरे, गादेगाव सोसायटीचे चेअरमन अविनाश बागल यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, उद्योग व व्यापार विभागाच्या वतीने सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी हनुमंतराव मोरे यांची तर गादेगाव विविध कार्यकारी सोसायटी नंबर-२ च्या चेअरमनपदी अविनाश रामचंद्र बागल यांची निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या हस्ते पंढरपूर येथील कार्यालयात सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी बोलताना नागेश फाटे यांनी मिळालेल्या संधीचा वापर सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी करावा अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी काँग्रेस कमिटीचे नूतन जिल्हा उपाध्यक्ष हनुमंत मोरे व गादेगाव विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन अविनाश बागल यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी नवनाथ बचुटे, संजय बागल, डॉ. रमेश फाटे, संग्राम कापसे, विनय शिंदे, शुभम फाटे उपस्थित होते.



## उमरगा येथे 'प्रसाद ' दिवाळी विशेषांकाचे दिमाखदार प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : मराठी साहित्य आणि संस्कृतीचा वारसा जपणारा 'प्रसाद ' दिवाळी विशेषांक २०२५ - २६ चे प्रकाशन सोहळा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पार पडला.

हा प्रकाशन सोहळा उमरगा येथील शासकीय विश्राम गृहात आयोजित करण्यात आला होता. ज्यात साहित्य आणि कला क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

या सोहळ्याला ज्येष्ठ साहित्यिक प्रा. कमलाकर भोसले, पोलिस अधिकारी श्रीकांत भराटे, डॉ. प्रतिक जोशी, के.पी. बिराजदार, प्रा. डॉ. विनोद देवरकर, भुमिपुत्र वाघ, मुस्लिम समाजाचे अध्यक्ष इमामजाफर औटी, प्राचार्य युसुफ मुल्ला, प्राचार्य विकास गायकवाड, पत्रकार प्रदीप भोसले, सचिन बिद्री, आदर्श शिक्षक ज्ञानेश्वर माशाळकर, अजित ( बंडू ) नेलवाडे, वीज कामगार महासंघाचे मोहन गुरव, आदर्श शिक्षक परमेश्वर साखरे, दत्ता सोनकवडे, सचिन पाटील, चेतन पवार आदी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन सोहळा संपन्न झाला.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर दिवाळी अंकाचे औपचारिक प्रकाशन करण्यात आले.

प्रकाशन समारंभ कार्यक्रमात बोलताना उपस्थित सर्व मान्यवरांनी दिवाळी अंकाचे महत्त्व स्पष्ट केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ साहित्यिक तथा रोटरी क्लब चे माजी अध्यक्ष कमलाकर भोसले म्हणाले, आजच्या वेगवान जीवनात दिवाळी अंक हे मराठी संस्कृतीला वाचकांशी जोडून ठेवण्याचे एक महत्त्वाचे माध्यम आहे. यातून केवळ मनोरंजन नव्हे, तर विचारांना नवी दिशा मिळते. हा अंक दर्जेदार व सुंदर सजावटीने परिपूर्ण आहे. साहित्यिक महाराष्ट्र राज्यासह संपूर्ण भारत देश यासह अमेरिका, इजिप्त, जपान, इटली, स्विझरलँड, दुबई या देशात राहणारे मराठी भाषीक साहित्यिकांनी दरवर्षी साहित्य पाठवत आहेत. यापुढे हा अंक या पेक्षा मोठा व्हावा व सतत प्रगती करत सध्या बारा वर्षे झाली आहेत. यापुढे शंभराव्या अंकापर्यंत साहित्य पाठवणार असल्याचे सांगितले.

यावेळी अंकाचे मुख्य संपादक लक्ष्मण पवार यांनी यावेळी 'प्रसाद ' अंकातील विशेष लेख, कथा आणि कविता व इतर साहित्यिकांची माहिती दिली. अनेक नवोदित लेखकांना संधी देण्यात आली आहे. हा अंक देशपातळीवर आहे. यापुढे इतर देशांतील मोठमोठे पुरस्कार मिळवत यश शिखरावर पोहचावे असे आवाहन यावेळी केले.

डॉ. प्रतिक जोशी, के.पी. बिराजदार, पोलिस अधिकारी श्रीकांत भराटे, साहित्यिक भूमिपुत्र वाघ यांनी आपल्या खास शैलीत शुभेच्छा देत, अंकाचे मुखपृष्ठ व त्यातील विषयांचे कौतुक केले. हा अंक वाचकांना नक्कीच आवडेल आणि तो त्यांच्या संग्रही राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सोहळ्याला अनेक साहित्यप्रेमी, लेखक आणि वाचक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी 'प्रसाद ' दिवाळी विशेषांकाचे उपसंपादक नसरोदिन फकीर यांनी उपस्थितांचे आभार मानले. हा सोहळा अत्यंत उत्साहाच्या वातावरणात पार पडला आणि मराठी साहित्यविश्वात एका नव्या अंकाचे स्वागत झाले.

### सहा लाखांचा मुद्देमाल जप्त; सहा जणांवर गुन्हा दाखल

## पोलीस पाटील यांच्या सतर्कतेने ॲल्युमिनियमच्या तारा चोरणारे सासवड पोलिसांकडून गजाआड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड :

टॉवर लाईन प्रकल्पाच्या ॲल्युमिनियमच्या तारा चोरणारे अविनाश लक्ष्मण कोळेकर (रा. दत्तनगर, हनुमानवाडी, आळंदी देवाची, केळगाव, ता. खेड), ऋषिकेश अर्जुन माळी (रा. दुसरा मजला, साईकॉलनी, बालाजीनगर, चाकण) यांना सासवड पोलिसांनी ताब्यात घेऊन ६ जणावर गुन्हा दाखल करण्यातआला आहे. तर त्यांचे साथीदार दीपक विनोद भगत (रा. नाणेकरवाड़ी, चाकण, पुणे) इतर २ ते ३ जणांना पळून जाण्यात यश आले. याबाबत दिनानाथ नारायण कोंगारी (मुख्य तंत्रज्ञ महाराष्ट्र राज्य



विद्युत पारेषण कंपनी ९२५, प्रशासकीय इमारत ३ रा मजला, कुंभारवाडा, कसबापेठ पुणे ११) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, २०१२ पासून थापेवाडी, गराडेत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने ४०० के. व्ही जेजुरी-हिंजवडी टॉवरलाईन प्रकल्पाचे काम चालू केले होते. त्यानंतर प्रकल्पाचे काम कोडीत, गराडे सोमुर्डी, मठवाडी, थापेवाडी या गावाचे हद्दीत चालू होते. सन २०१४ मध्ये काही कारणस्तव ते काम बंद पडले. प्रकल्पाचे काम कोडीतमध्ये पूर्ण झाले नसून, सध्या ते बंद स्थितीमध्ये आहे.

शुक्रवारी (दि. १७) पहाटे १ ते ५ च्या दरम्यान चोरी करून कोडीत येथून ॲल्युमिनियमच्या चोरीच्या तारा घेऊन जाणारी गाडी कोडीत वरून गराडे च्या दिशेने जात असल्याची गोपनीय माहिती पोलीस पाटील गणेश बडदे यांनी पोलिस निरीक्षक कुमार कदम व सहाय्यक पोलिस निरीक्षक वैभव सोनवणे यांना दिली पोलीस कर्मचारी बापू मेहत्रे, पोलीस कॉ. बाबर, कोडीतचे पोलीस पाटील गणेश बडदे, माजी सदस्य अमोल बडदे या पथकाने व रळि वैभव सोनवणे आणि पो हा.सुहास लाटणे यांनी कोडीत गराडे मार्गे१० कि. मिटर अंतर पाठलग करत बापदेव घाटातील दुसऱ्या वळणावर नाट्यमय रित्या गाडी पकडली.या पथकाने कारवाई करून तारा चोरून घेऊन जाणारा टेम्पो (एम. एच.१४ एल. बी ७४२६) तारा तसेच चोरी करण्यासाठी लागणारे साहित्यासह पकडले. यात ३ लाख ४८ हजार ७५० रुपयांच्या ६४० स्केअर मि.मि. च्या २३२५ किलो वजनाच्या तारा, टेम्पो असे एकूण ५ लाख ९९ हजार १५० मुद्देमाल ताब्यात घेतला. त्यांचे अन्य साथीदार हे पळून गेले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक कुमार कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक श्रीराम पालवे करत आहेत.

# गोगांव येथे गोरगरीब गरजूना १२५ किराणा किट वाटप

## अडचणीच्या काळात सिद्धार्थ सोशल फौंडेशनचे कार्य उल्लेखनीय : सरपंच वनिता सुरवसे





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी :

अतिवृष्टी व पुरामुळे नागरिकांचे मोठे नुकसान झाले असून,अनेक कुटुंब संकटातून बाहेर येऊ शकलेली नाहीत. अशा बिकट परिस्थितीत हजूर न्यू अँड रिन्यू एबल एनर्जी प्रा.लि.व सिद्धार्थ सोशल फौंडेशन या संस्थेच्यावतीने पूरग्रस्त कुटुंबांना दिवाळी सण गोड व्हावी यासाठी किराणा साहित्याचे १२५ किट वाटप करून मदतीचा हात देण्यात आला.

### हजूर न्यू अँड रिन्यू एबल एनर्जी प्रा. लि. व सिद्धार्थ सोशल फौंडेशनचा उपक्रम

गोगाव ता.अक्कलकोट येथे हजूर न्यू अँड रिन्यू एबल एनर्जी प्रा.लि.व सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गरीब व गरजू लोकांना धान्याचे किट वाटपचा कार्यक्रम पार पडला.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच वनिता मधुकर सुरवसे हे होत्या. कंपनीचे प्रतिनिधी नितीन कांबळे,निजपा गायकवाड, भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप,परमेश्वर शेळके(पैलवान)धोंडूराज बनसोडे,मारुती सोनकवडे , रमेश मंगाणे, कल्याणराव बिराजदार उपस्थित होते.

गोगाव सरपंच वनिता सुरवसे बोलताना म्हणाल्या की,सामाजिक बांधिलकी म्हणून सिद्धार्थ सोशल फौंडेशन व हजूर न्यू अँड रिन्यू एबल एनर्जी प्रा.लि.या संस्थेतर्फे विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविले जातात.यावर्षी अतिवृष्टी व पुरामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या गोर गरिब कुटूबीयांना आधार व्हावा यासाठी नेहमीप्रमाणे मदत केली आहे. खरोखर त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे. असे म्हणाल्या.

प्रस्तावना करताना संस्थेचे अध्यक्ष तथा उपसरपंच कमलाकर सोनकांबळे म्हणाले की,जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व धर्मादाय सह आयुक्त यांच्या आदेशाने अक्कलकोटचे आ.सचिन कल्याणशेट्टी यांच्या आवाहनानुसार युवा नेतृत्व बसवराज शेळके व भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सिद्धार्थ सोशल फौंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने हजूर न्यू अँड रिन्यू एबल एनर्जी प्रा.लि.यांच्या मदतीने गोगांव येथील गोरगरीब गरजू , शेतकरी व मजुरांना १२५ किटचे वाटप केले.

यावेळी बोलताना नितीन कांबळे म्हणाले की,गरीब व गरजूंची दिवाळी गोड व्हावी म्हणून सिद्धार्थ सोशल फौंडेशनचे एक छोटीशी प्रयत्न आहे. हजूर न्यू अँड रिन्यू एबल एनर्जी प्रा.लि. कंपनी यापुढे शेतकऱ्याच्या कुठल्याही अडचणीत आमची कंपनी सहकार्य करण्यास सदैव तत्पर आहे. यावेळी मनोगत व्यक्त करताना कल्याणराव बिराजदार म्हणाले की, संस्थेचे सामाजिक उपक्रम चांगले असून संस्थेचे अध्यक्ष कमलाकर सोनकांबळे जनहिताचे काम करत असतात असे म्हणाले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शांतकुमार बनसोडे, प्रदीप भा. जगताप, परमेश्वर गायकवाड, सूर्यकांत जिरगे, निगाणा तावरखेड, विजयकुमार गायकवाड, मौला नदाफ, नामदेव बनसोडे, असलम मुल्ला,आकाश गायकवाड, विनोद बनसोडे,संजय गायकवाड जगनाथ सुरवसे सायबाना जमादार आदिनी परिश्रम घेतले.

सूत्रसंचालन नितीन गायकवाड यांनी केले तर आभार सुरेश सोनकांबळे यांनी मानले.





























